उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर यांच्या अधिपत्याखालील नव्याने मंजूर करण्यात आलेल्या जिल्हा शल्य चिकित्सक, सांगली येथील ०८ अस्थाई पदे पुढे चालु ठेवण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः अपदे-२०१९/प्र.क्र.१९५/आरोग्य-४

१० वा मजला, संकुल इमारत,
गो.ते. रुग्णालय आवार, मुंबई-४०० ००१.
तारीख: ३१ ऑगस्ट, २०१९.

वाचा :- १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः पदनि-२०१७/प्र.क्र.४०(भाग-२)/आरोग्य-३, दि.२३.०५.२०१८.

२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : पदनि-२०१ ६/प्र.क्र.८/१६/आपुक, दि.०५.०३.२०१८, दि.०७.०९.२०१८ व दि.२१.०२.२०१९.

३) आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे/कक्ष-३/टे-१२/जिशचि, सांगलीकार्यालय/अपदे/सन १९-२०/११७८९-९०/१९, दि.२०.०८.२०१९.

शासन निर्णय :-

उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर यांच्या अधिपत्याखालील जिल्हा शल्य चिकित्सक, सांगली येथील ०८ अस्थाई पदे संदर्भाधीन अनुक्रमांक १ येथील दि.२३.०५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आली आहेत. सदर पदांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर यांच्या अधिपत्याखालील जिल्हा शल्य चिकित्सक, सांगली येथील यासोबत जोडलेल्या विवरणपत्र “अ” मध्ये नमूद केलेल्या ८ अस्थाई पदांना खालील अटींच्या अधीन राहून दि.२३.०५.२०१८ ते दि.३०.०९.२०१९ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे :-

१) उपरोक्त पदांपैकी कोणतेही पद ६ महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त नाही व ज्या कारणांसाठी पदे मंजूर केली आहेत, त्या अटी व शर्तीचे पालन करण्यात आले आहे.

२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.०५.०३.२०१८, दि.०७.०९.२०१८ व दि.२१.०२.२०१९ नुसार विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तीचे कटाक्षाने पालन करण्यात यावे व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. त्याचप्रमाणे कार्यालयाचा पदविषयक सुधारित आकृतिबंध उच्चस्तरीय समितीकडून अंतिमत: मान्य करुन घेण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

३) विहीत मुदतीत पदांच्या आढाव्याची कार्यवाही पूर्ण न झाल्यास अस्थायी पदांना त्या पुढील कालावधीसाठी मुदतवाढ न मिळाल्यास व त्यामुळे अधिकारी / कर्मचारी यांच्या वेतन व भत्ताचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांची राहील.

३. सदर पदांवरील होणारा खर्च, मागणी क्रमांक.आर-१, मुख्य लेखाशीर्ष "२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०१- नागरीक आरोग्य सेवा-विषम चिकित्सा, ११० - रुग्णालये व दवाखाने, ११०-२- मुफसल क्षेत्रातील व दवाखाने, (०१)(०१) - मुफसल क्षेत्रातील अध्यापनेत्तर शासकीय रुग्णालये (२२१० ०१४६)" या लेखाशिर्षाखालील सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरीता मंजुर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.०५.०३.२०१८, दि.०७.०९.२०१८ व दि.२१.०२.२०१९ अन्वये प्रशासकीय विभाग प्रमुखांना प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८३०१११६१६२६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, serialNumber=ed0fa40788bb5c0d7f76b869fa2e5835af215c6a80eae8f70eaf87b0cf68d63f, cn=Pradip M Balkavde
Date: 2019.08.30 23:58:26 -07'00'

(प्र.मो.बलकवडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, आरोग्य भवन, मुंबई.
२. संचालक, आरोग्य सेवा-१, संचालनालय, आरोग्य भवन, मुंबई.
३. संचालक, आरोग्य सेवा-२, पुणे.
४. सहसंचालक आरोग्य सेवा, रुग्णालये, (राज्यस्तर), मुंबई.
५. उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर.
६. महालेखापाल, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/ नागपूर.

७. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, कोल्हापूर.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर.
९. वित्त विभाग (व्यय-१३, अर्थसंकल्प-१९), मंत्रालय, मुंबई.
१०.अवर सचिव (सेवा-२/ सेवा-३/ सेवा-५ /अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
११.निवडनस्ती (२ प्रती) (कार्यासन - आरोग्य- ४).

विवरण पत्र - अ

कार्यालयाचे नाव - जिल्हा शल्य चिकित्सक सांगली, जि.सांगली

अ.क्र.	तात्पुरती पदे प्रथमता ज्या शासन निर्णयान्वये निर्माण केली तो शासन निर्णय क्रमांक व दि	पदनाम	पद संख्या	वेतनश्रेणी (पुर्ण रुपयात)	ज्या शासकिय आदेशान्वये शेवटी पदे पुढे चालू ठेवण्यांत आली तो शा.नि. क्र. व दिनांक	ज्या तारखेपासून पदे पुढे चालू ठेवावयाची आहेत त्याचा दिनांक	लेखाशिर्ष
1	2	3	4	5	6		7
१	शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. पदनि २०१८/प्रक्र.४० (भाग-२)/आरोग्य ३ दि. २३ मे २०१८.	जिल्हा शल्य चिकित्सक	1	15600-39100-6600	नवनिर्मित पद	२३ मे २०१८ ते २८ फेब्रुवारी २०१९ व पुढील दि. 9 मार्च 2019 ते दि. 29 फेब्रु. 2020	२२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०१-नागरी आरोग्य सेवा व विषम चिकित्सा ११०-रुग्णालये व दवाखाने ११०-२ मुफसल क्षेत्रातील दवाखाने (०१)(०१) मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये (२२१००१४६)
२		निवासी वैद्यकीय अधिकारी (बाहयसंपर्क)	1	15600-39100-6600			
३		प्रशासकीय अधिकारी	1	9300-34800-4400			
४		आरोग्य परिचारिका	1	9300-34800-4300			
५		कार्यालयीन अधिक्षक	1	9300-34800-4300			
६		लेखापाल/सहाय्यक अधिक्षक	1	9300-34800-4200			
७		सांख्यिकी सहाय्यक	1	9300-34800-4200			
८		वरिष्ठ लिपीक	1	5200-20200-2400			
	एकुण पदे		8				